मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## संरक्षण व सामिरकशास्त्र विभाग

## सर्जिकल स्ट्राइक डे अहवाल

दि. २९ सप्टेंबर. २०२२

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सर्जिकल स्ट्राइक डे आयोजित करण्यात आला याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.व्ही रसाळ प्रमुख वक्ते सुभेदार मेजर चंद्रभान पवार उपप्राचार्य व संरक्षण शास्त्र विभाग प्रमुख प्रा आर व्ही पवार नॅक समन्वयक सी ई गुरुळे प्रा ए ए पोटे प्रा दीपक खुर्चे श्रीमती जे आर बागुल डॉ श्रीमती एस आर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सुभेदार मेजर चंद्रभान पवार यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, भारतीय सैन्याने केलेल्या सहाशी धाडसी कार्यवाहीमुळे आपण आज सुरक्षित आहोत 18 सप्टेंबर 2016 रोजी उरी येथे भारतीय लष्कराच्या तळावर 4 अतिरेक्यांनी हल्ला केला ज्यात भारतीय 19 जवान शहीद झाले भारतीय स्पेशल फोर्स द्वारे या हल्ल्याची तपासणी करण्यात आली यामध्ये असे स्पष्ट झाले की हा हल्ला पाकिस्तान स्थित दहशतवादी संघटना जैश-ए मोहम्मद या संघटनेने केला आहे हे सिद्ध झाले भारत सरकारने 21 सप्टेंबर 2016 रोजी पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल बासित यांना या हल्ल्यामध्ये पाकिस्तानचा सहभाग असल्याबाबत निषेध पत्र दिले गुरुदासपूर आणि पठाणकोट मध्ये अशाच हल्ल्यानंतर उरी हल्ला झाला. परंतु उरी हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने बऱ्यापैकी संयम सोडला या हल्ल्यांचे प्रत्युत्तर पाकिस्तानला देणे आवश्यक होते परिणामी याचा उद्रेक सर्जिकल स्ट्राइक च्या रूपात झाला उरी हल्ल्याच्या 11 दिवसानंतर भारत सरकारने भारतीय सेनेला सर्जिकल स्ट्राइक करण्याबाबत पूर्ण अधिकार दिले त्यानंतर भारतीय सेनेने एलओसी ओलांडून पीओके क्षेत्रा तील दहशतवाद ठिकाणांची सर्व माहिती मिळवली त्यानंतर लष्करी लॉन्च पॅट्स नष्ट करण्यात आले. व भारतीय स्पेशल फोर्स पुन्हा सीमा भागात पहाटे 04:30 वाजता परतली आणि 29 सप्टेंबर 2016 रोजी सर्जिकल स्ट्राइक यशस्वी झाल्याचे देशात जाहीर करण्यात आले

प्रास्तविकात संरक्षणशास्त्र विभाग प्रमुख प्रा आर व्ही पवार यांनी 29 सप्टेंबर 2016 रोजी पाक व्याप्त काश्मीर मध्ये भारतीय सैन्यांनी सर्जिकल स्ट्राइक करून

दहशतवादी ठिकाणी उध्वस्त केली त्यामुळेच आपण हा दिवस सर्जिकल स्ट्राइक डे म्हणून साजरा करतो तसेच सर्जिकल स्ट्राइक डे चे महत्व सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी व्ही रसाळ म्हटले की छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे गनिमी कावा या युद्धनीती द्वारे बलाढ्य साम्राज्यांचा पराभव केला त्याच अनुषंगाने भारतीय सेनेमध्ये याच युद्धनीतीचा वापर केला यालाच आपण सर्जिकल स्ट्राइक म्हणतो आपले सैनिक दिवस-रात्र एक करून देशाच्या सीमा भागात -50 °C कमी तापमानात व 50 °C जास्त तापमानात सुरक्षा देत असतात सर्जिकल स्ट्राइक डे सारखे कार्यक्रम साजरा करण्यामागचा मूळ हेतू तरुण पिढीला आपल्या देशाच्या सैन्याबाबत आदर प्रेम आपले कर्तव्य काय आहे याची जाणीव व्हावी तसेच ज्याप्रमाणे कोणत्याही कठीण परिस्थितीमध्ये आपले सैनिक खचून न जाता आत्मविश्वासाने शत्रूविरोधात लढा देतात असे त्यांनी आपल्या मनोगतात प्रतिपादन केले

या कार्यक्रमासाठी प्रा आर एम आंबेकर डॉ जी आर पाटील डॉ डीबी वेलजाळी प्रा बी यु पवार प्रा एल एस कळस्कर प्रा आर डी खुर्च प्रा आर बी उगले प्रा व्ही एम हरक प्रा ए एस पोटे सूत्रसंचालन प्रा दीपक खुर्चे केले तर आभार प्रा एस बी झाडे यांनी मानले